ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १९ डिसेंबर, १९५१ अंक ४८

## विविध माहिती

**ब्रिटनची तंबाखूची आयात**—चालू वर्षाच्या पहिल्या दहा महिन्यांत ब्रिटननें २४,९०,००,००,००० पौंड तंबाखूची आयात केली. गेल्या वर्षीच्या ह्याच कालखंडांतील आयातीपेक्षां वरील आंकडा २,५०,००० पौंडांनीं अधिक आहे. गेल्या ऑक्टोबर-मध्यें झालेल्या एकूण आयातींत अमेरिकेकडून ५,९६,००,००० पौंड तंबाखू आयात झाली.

**नेपाळमध्यें रिझर्व्ह बँकेचे अधिकारी**—रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. रामनाथ नेपाळला गेले आहेत. नेपाळ राज्यांत चलनविषयक सुधारणा घडवून आणण्यासाठीं आणि सरकारी बँकेची स्थापना करण्यासाठीं ते मदत करणार आहेत. नेपाळचीं नाणीं भारतांतच पाडलीं जातात. भारतीय रुपया = नेपाळी रुपया असा हुंडणावळीचा दर असला तरी गेले कांहीं दिवस नेपाळी रुपयाची किंमत घसरत चालली होती.

**साखरेच्या उत्पादनांत सुधारणा**—चालू सालीं भारत आपली साखरेची गरज स्वतःच्या उत्पादनांतून भागवूं शकल असें समजतें. १९५०–५१सालीं साखरेचें उत्पादन ११·०१ लाख टन झालें होतें. त्यापूर्वीच्या सात वर्षांत इतकें उत्पादन केव्हांच झालें नव्हतें. चालू वर्षीं त्याहिपेक्षा अधिक उत्पादन होईल. साखरेवरील नियंत्रण अंशतः दूर केल्याचा हा परिणाम आहे असें म्हणतात.

**विझगापट्टम येथील बोटी बांधण्याची कंपनी**— विझगापट्टम येथील शिंदिया ही बोट बांधणारी कंपनी भारतीय सरकार आपल्या ताब्यांत घेणार आहे. शिंदिया कंपनी आणि सरकार ह्यांच्या संयुक्त मालकीची नवीन कंपनी काढण्याचें ठरलें होतें. परंतु आतां एका फ्रेंच कंपनीला सरकारशीं भागीदारी स्वीकारण्याचें आवाहन देण्यांत आल्याचें समजतें. नवीन कंपनी १९५२ च्या जानेवारींत स्थापन होईल. ह्या कंपनींत भारतीय सरकार आपलें भांडवल बहुमत राहील इतकें घालणार आहे.

**जगाची लोकसंख्या**— १९५० च्या मध्याला जगाची लोकसंख्या सुमारें २४० कोटी असावी असा अंदाज संयुक्त-राष्ट्र-संघाच्या आंकडे-विषयक कचेरीनें केला आहे. तपशील पुढील-प्रमाणें आहे. आफ्रिका १९·८ कोटी; उत्तर अमेरिका २१,६३,००,०००; द. आफ्रिका ११,१४,००,०००; रशिया सोडून आशिया १२७·२ कोटी; रशिआ सोडून यूरप ३,९६३,००,०००; रशिआ १९,३०,००,०००.

**शिरगणतीच्या कामगारांचा गौरव**—१९५१ सालीं करण्यांत आलेल्या शिरगणतींत चांगली कामगिरी बजावल्याबद्दल कलकत्त्या-मधील ७२ अधिकाऱ्यांना राष्ट्रपतींचीं चांदीचीं व ब्रॉंझचीं पदकें देण्यांत आलीं. त्याशिवाय एका खाजगी व्यक्तीनें दिलेलीं दोन रौप्यपदकें व कप दोन कामगारांना देण्यांत आलीं.

**अमेरिकेंत किंमती वाढणार**—अमेरिकेंतील कारखानदारांना आपल्या मालाच्या किंमती वाढविण्याचे अर्ज करण्याची परवानगी किंमत-नियंत्रण बोर्डानें दिली आहे. त्यामुळें आतां कापड, मांस, दूध, लोणी, कोळसा, पेट्रोल, तंबाखू, बीर-दारू, औषधें, सौंदर्य-प्रसाधनें इत्यादि वस्तूंच्या किंमती वाढण्याचा संभव निर्माण झाला आहे.

**जपानसाठीं रशिआचा कोळसा**—रशिआकडून ४,००,००० टन कोळसा घेण्याच्या वाटाघाटी टोकिओमधील रशिअन व्यापारी प्रतिनिधींशीं एक जपानी कंपनी करीत आहे. ही बोलणीं यशस्वी झालीं तर रशियाला कोळशाची किंमत पौंडांत देण्यांत येणार असल्याचें समजतें. दर टनामागें १० डॉलर्स किंमत सांगण्यांत येत आहे.

**मतें पोस्टानें टाकणार**—येत्या सार्वत्रिक निवडणुकींत उत्तर-प्रांतांत सुमारें २·८ लाख मतदार आपलीं मतें पोस्टानें धाडणार आहेत. त्यापैकीं ३०,००० मतदार सैनिकी पेशाचे असून बाकीचे उमेदवारांचे एजंट आणि निवडणुकीच्या कामांत भाग घेणारे सरकारी अधिकारी आहेत.

**खताची वांटणी**—सिंद्री येथील खताच्या कारखान्यांत तयार होणारें खत भारतीय सरकारचें अन्न व शेतकी खातें एका मध्यवर्ती संघटनेतर्फे वांटणार आहे. त्यासाठीं बिगर सरकारी एजन्सी वापरण्याचा सरकारचा इरादा नाहीं. निदान १९५२ अखेर तरी वांटपाची हीच व्यवस्था राहणार आहे.

**अन्नाच्या देणग्यांवर कर माफ**—भारताच्या इतर राज्यां-तून बिहारसाठीं येणाऱ्या अन्नाच्या देणग्यांवर विक्रीकर अगर इतर कर द्यावयाचे नाहींत असें बिहार सरकारनें ठरविलें आहे. परदेशांतून येणाऱ्या अन्नाच्या देणग्यावरहि अशीच माफी देण्यांत येणार आहे.

**रशियांत भारतीय चित्रपट**—रशिआंतील चित्रगृहांतून सध्यां विमल घोष ह्यांनीं दिग्दर्शित केलेला 'उपेक्षित' हा बोलपट दाखविण्यांत येत आहे. हा चित्रपट रशिअन लोकांना फार आवडल्याचें समजतें.

## तेलशुद्धीचे भारतांतील नियोजित कारखाने

### विदेशी कंपन्यांना निमंत्रण व आश्वासन

स्टँडर्ड–व्हॅक्युम ऑइल कंपनीला मुंबई शेजारीं ट्रॉम्बे येथें तेल शुद्धीचा कारखाना ( ऑइल रिफाइनरी ) काढण्यास मंजुरी मिळाली आहे; तसेच कारखाने भारतांत इतरहि कांहीं ठिकाणीं आतां निघण्याची शक्यता आहे. भारत सरकारच्या, बर्मा शेल बरोबर मुंबई येथेंच आणखी एक तेलशुद्धीचा कारखाना काढण्याबाबत वाटाघाटी चालू आहेत आणि मद्रास येथें तिसरा कारखाना उभारण्याच्या वाटाघाटीसाठीं काल्टेक्स कंपनीचा प्रतिनिधि इकडे येत आहे. १९४८ सालींच भारत सरकारनें ह्या कंपन्यांना कारखाने उभारण्याची विनंति केली होती. आबादानचें तेल बंद पडल्यामुळें आतां त्याबाबत पुनः वाटाघाटी सुरू झाल्या आहेत. हिंदी राष्ट्रीय भावनेचा अतिरेक होऊन ह्या कंपन्यांचें पुढें नुकसान होणार नाहीं ह्याविषयीं त्यांची खात्री पटवावी लागली आहे. २५ वर्षें तरी स्टँडर्ड व्हॅक्युम कंपनीच्या कारखान्याचें राष्ट्रीयीकरण केलें जाणार नाहीं आणि त्यानंतर राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेंच तर भरपूर मोबदला दिला जाईल, असें त्या कंपनीला आश्वासन मिळालें आहे. क्रूड ऑईल–अशुद्ध तेल–आयात होईल त्यावर जकात घेतली जाणार नाहीं आणि कारखान्याच्या यंत्रसामुग्रीवर जकात सवलतीच्या दरानें आकारली जाईल. कंपनीला जो नफा होईल तो अमेरिकेंत नेण्यासाठीं तिला पुरेशी हुंडणावळ उपलब्ध करून दिली जाईल. आयात तेलापेक्षां भारतांत तयार होणारें तेल व पेट्रोल स्वस्त विकलें गेलें पाहिजे अशी मागणी केली जाणार नाहीं. सध्यां दिगबोई येथें तेलशुद्धीचा एक लहानसा कारखाना आहे, त्यांत ह्या नव्या तीन कारखान्यांची भर पडली म्हणजे सबंध हिंदी मागणी पुरी पडूं शकेल अशी अपेक्षा आहे.

---

### सहकारी वर्ष

वेगवेगळ्या राज्यांत व संस्थानांत सहकारी वर्ष कसें वेगवेगळ्या दिवशीं संपतें, त्याची माहिती खाली दिली आहे. वर्षअखेर अशी भिन्न असल्याकारणानें, तुलनेसाठीं घेतलेले आकडे अगदी एकाच काळाचे असूं शकत नाहींत. तथापि, सर्व सहकारी सोसायट्यांचें वर्ष ३० जून अखेरलाच संपविण्यांत यावें, असा प्रयत्न रिझर्व्ह बँकेनें भारत सरकारमार्फत चालविला आहे, त्यास यश येत आहे.

| राज्य किंवा संस्थान | वर्ष अखेर |
|---|---|
| आसाम व सिरपूर | ३१ मार्च |
| मद्रास, मुंबई, प. बंगाल, उ. प्रदेश, मध्यप्रांत, वऱ्हाड, ओरिसा, कूर्ग, अजमीर–मारवाड, म्हैसूर, मध्यभारत, सौराष्ट्र, भोपाळ व हैद्राबाद | ३० जून |
| पू. पंजाब, दिल्ली आणि पेप्सु | ३१ जुलै |
| कोचीन आणि त्रावणकोर | १५ ऑगस्ट |
| काश्मीर | १५ सप्टेंबर |
| बिहार | ३१ डिसेंबर |
| राजस्थान–कोटा | ३१ जुलै |
| अलवार, मेवाड | ३० जून |
| भरतपूर | ३१ ऑक्टो. |


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

खेळतें भांडवल रु. तीन कोटींचे वर

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे (अध्यक्ष) श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. न. ग. पवार श्री. मा. रा. जोशी
श्री. फ. दो. पदमजी श्री. मा. वी. शहा
श्री. शं. ल. किर्लोस्कर श्री. मा. म. गुप्ते

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँकेच्या शाखा

मुंबई ( फोर्ट, गिरगांव व दादर ), कल्याण, पुणें ( डेक्कन जिमखाना व खडकी), सोलापूर ( फलटण गल्ली व मुरारजी पेठ ), धुळें, जळगांव, चाळिसगांव, नाशिक, कोपरगांव, कोल्हापूर, रत्नागिरी, नागपूर, हुबळी, द. हैदराबाद. सांगली व अमरावती.

हेड ऑफिस
लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिं.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जे देणें, सोनें–चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १९ डिसेंबर, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी आर्थिक परिस्थितीचा आढावा

### अर्थमंत्र्यांचा आशावाद

असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सची वार्षिक सभा कलकत्ता येथें गेल्या आठवड्यांत भरली होती. त्यावेळीं अर्थमंत्री, श्री. देशमुख, ह्यांनीं आपल्या भाषणांत भारताच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन इतर कित्येक देशांचे मानानें भारतांतील परिस्थिति वाईट नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यानें आर्थिक व सामाजिक उद्धाराच्या आखलेल्या योजना त्याचे साधनसामुग्रीचे मानानें त्याच दूरगामी आहेत आणि त्या योजनांत तातडीच्या योजनांस प्राधान्य देऊन योजना समितीनें योग्य तीच दिशा दाखविली आहे, असें सांगितलें. भारताच्या ह्या उपक्रमास सर्वांच्या साहाय्याची व सहानुभूतीची गरज असल्यानें सर्वांकडून योग्य ते प्रयत्न व स्वार्थत्याग केले जातील अशी आशा त्यांनीं व्यक्त केली. श्री. देशमुख ह्यांच्या भाषणांतील कांहीं महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्श येथें घेतला आहे.

#### बँक रेटमधील वाढ

१९५० मध्यें किंमती हळूहळू एकसारख्या वाढत गेल्या. डिसेंबर १९४९ मध्यें त्यांचा इंडेक्स नंबर ३८१·३ होता तो डिसेंबर १९५० मध्यें ४१२·६ झाला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील घडामोडी आणि अमेरिकाप्रभृति देशांची शस्त्रवाढ, ह्यामुळेंच किंमतींत मुख्यतः वाढ झाली. किंमती वाढूं न देण्याची सरकारनें शिकस्त केली, तरी १९५१ मध्येंहि वाढ चालूच राहिली. आणि, गेल्या कांहीं महिन्यांत त्यांत थोडा उतार दिसूं लागला आहे. गेल्या एप्रिलमध्यें इंडेक्स नंबर ४५७·५ पर्यंत चढला होता. नोव्हेंबरमध्यें तो ४३५·६ पर्यंत उतरला आहे. पूर्वी तो वाढला त्याबद्दल भारत सरकारास ज्याप्रमाणें दोष देतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें तो उतरल्याबद्दलहि त्यानें पाठ थोपटून घेण्याचें कारण नाहीं. मध्यवर्ती सरकारच्या बजेटांत चालू उत्पन्नांतूनच चालू खर्च भागविण्याची खबरदारी घेण्यांत आली, ह्याचा परिणाम झाला हें उघड आहे. रिझर्व्ह बँकेनें बँक रेट नुकताच वाढविला आहे, तोहि त्याच हेतूनें आहे. कर्जपुरवठा नियंत्रित करण्याचें साधन म्हणून बँक रेटमध्यें बदल करण्याची पद्धत कांहीं नवी नाहीं आणि कर्जास मागणी वाढविणाऱ्या मोसमाचे आरंभींच बँक रेट बदलणें हें केव्हांहि प्रभावी ठरतें. गेल्या कांहीं दिवसांत पैशाच्या बाजारांतील तंगी वाढत आहे, त्याचे पाठोपाठ आतां बँक रेटमधील वाढ आली आहे, परंतु ती वाढ विचारपूर्वकच करण्यांत आलेली आहे.

#### 'बिल मार्केट'चा अभाव

चालू मोसमांत रिझर्व्ह बँक सरकारी रोखे विकत घेणार नाहीं; त्यांचे तारणावर फक्त कर्ज देईल, ह्या निर्णयाचा अर्थ बँक बाजाराचे बाहेरच राहील असा केला जात आहे, तो चुकीचा आहे. खऱ्या व्यवहारावर आधारलेल्या हुंड्यांचे ऐवजीं, सरकारी रोख्यांचे तारणावर व्यापारी बँकांना कर्जे देणें व तीं त्यांनीं मोसमाचे अखेर फेडणें, हीच योजना मध्यवर्ती बँकेनें हुंड्या डिस्कौंट करण्याचे पद्धतीच्या अगदीं नजीक येईल. भारतांत "बिल मार्केट" निर्माण करण्याचे मार्गांत अनेक अडचणी आहेत. मूळ अशा हुंड्यांचाच तुटवडा आहे. आणि कर्जांचें हुंड्यांत रूपांतर करणें हीहि गोष्ट अवघड आहे, तथापि त्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न रिझर्व्ह बँक करणार आहे.

#### धान्याच्या वाढवून दिलेल्या किंमती

कांहीं राज्यांत धान्याच्या लेव्हीची किंमत वाढवून देण्यांत आलेली आहे. शेतकऱ्यांचे दृष्टीनें, ही वाढ अपुरी आहे असें सांगण्यांत येतें, तर ह्या वाढीमुळें चलनवाढीस चालना मिळेल अशीहि टीका केली जाते. अडचणीच्या काळांत किंमती स्थिर राखण्याचा तो प्रयत्न आहे, एवढाच त्या निर्णयाचा अर्थ आहे. उत्पादकाला ज्यास्त पैसे देण्याचा किंवा चलनवाढीचा त्यांत उद्देश नाहीं. आयातीप्रमाणेंच अंतर्गत धान्यवसुलीवर आपली रेशनिंगची योजना अवलंबून आहे. कांहीं ठिकाणीं पाऊस अपुरा पडल्यामुळें धान्याची खुल्या बाजारांतील किंमत चढली आणि सक्तीची धान्य वसुली अवघड झाली. वसुलीच्या किंमतींत थोडी वाढ केली तर वसुली ज्यास्त होईल, अशा अपेक्षेनें किंमत वाढवून देण्यांत आली आहे. धान्य वसुली चांगली होणें ही निकडीची गरज भागविण्यास किंमत-वाढ मदत करते, हा कांहीं राज्यांतील गेल्या वर्षाचा अनुभव जमेस धरण्यांत आला आहे. ज्या मानानें वसुली ज्यास्त होईल, त्या मानानें अधिक महाग विदेशी धान्य घेण्याचें कारण नाहीं.

#### पंचवार्षिक योजनेवरील टीका

पंचवार्षिक योजनेला येणारा खर्च भारताला पेलेल किंवा नाहीं ह्याविषयीं आणि योजनेंतील खासगी उपक्रमांबाबत धोरणाविषयीं असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्सनें शंका व्यक्त केली. परंतु ज्या साधनसामुग्रीवर योजनेची उभारणी करण्यांत आली आहे, त्या सामुग्रीची नीट छाननी केलेली आहे आणि ती उपलब्ध करून देण्याचा नीट प्रयत्न केला तर योजनेला लागणारा पैसा मिळणें अवघड जाऊं नये. योजनेंतील कांहीं अंदाज चुकणें अगदीं शक्य आहे आणि प्रचंड योजना हातीं घेणें आणि ती पुरी करणें ह्यांत महदंतर आहे हें उघड आहे. परंतु, त्याविषयीं निराशा व्यक्त करणें हें अडचणींचा नसता बाऊ करण्यासारखें आहे. भारताच्या आगामी आर्थिक संसारांत खासगी प्रयत्नांस दिलेलें स्थान, हें परिस्थितीस अगदीं धरूनच आहे. राष्ट्रीयीकरण व खासगी उपक्रम शेजारी शेजारी चालू ठेवूनहि बरेंच नियोजन करतां येणें अगदीं शक्य आहे. योजनेच्या पहिल्या कांहीं वर्षांत शेती, पाणीपुरवठा व वीजपुरवठा ह्यांकरितां सरकारी खर्चास प्राधान्य देण्यांत आलें आहे, हें खरं आहे. औद्योगिक कारणांसाठीं जास्त पैशाची तरतूद आवश्यक होती अशी तक्रार करण्यांत येते. परंतु, सध्या देशापुढील सर्व प्रश्नांत अन्नतुटवड्याचा प्रश्न सर्वांत अधिक तातडीचा आहे. तेव्हां तो सोडविण्यास पोषक अशा पाणीपुरवठ्याच्या योजनांस प्राधान्य मिळणें क्रमप्राप्त होतें आणि त्या योजनांस जोडूनच वीजपुरवठ्याच्या सोई आपोआपच येतात.

परंतु, त्याचा अर्थ इतर बाबींच्या वाढीकडे दुर्लक्ष झालें आहे असा मात्र नव्हे. खासगी प्रयत्नांस ठेवलेला वाव पुरेसा आहे, इतकेंच नव्हे तर खासगी भांडवलाची जेवढी उभारणी येत्या कांहीं वर्षांत होऊं शकेल, ती सर्व अपुरी पडेल इतका तो मोठा वाव आहे.

### मॅनेजिंग एजन्सी पद्धतीमधील दोष

बहुतेक उद्योगधंदे मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें चालविण्यांत येतात. ह्या पद्धतीनें, मॅनेजिंग एजन्सीची फर्म वेगवेगळया प्रकारचे उद्योगधंदे चालविते आणि त्याबाबत व्यवस्थापकत्वाचे दीर्घ मुदतीचे करार असतात. मॅनेजिंग एजंटांना मोबदला म्हणून उत्पादन, विक्री अथवा नफा ह्यांचेवर अवलंबून ठेवलेलें कमिशन मिळत असतें. प्रारंभीच्या काळांत मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी महत्त्वाची कामगिरी केली असली, तरी त्या पद्धतींत कित्येक दोषहि आहेत. हे दोष आतां प्रकट दिसूं लागले असून मॅनेजिंग एजंटस व भागीदार ह्यांचे हितसंबंधांचे खटके उडूं लागले आहेत. मॅनेजिंग एजन्सीच्या हक्कांची खरेदी–विक्री मोठ्या प्रमाणावर होत आली आहे, परंतु अशा व्यवहारांपासून संबंधित उद्योगधंद्यांचा कांहींच फायदा होत नाहीं; उलट भांडवलाच्या पुरवठ्यावर त्याचा अनिष्ट परिणाम झालेला आहे. कच्च्या मालाची खरेदी, पक्क्या मालाची विक्री आणि आर्थिक देवघेवींची गुंतागुंत ह्यांत अनिष्ट कारवाया उघडकीस आल्या आहेत. औद्योगिक कार्यक्षमतेस आवश्यक असलेल्या, व्यवस्थेमधील आणि व्यवहारांतील सुधारणा घडवून आणण्यास कित्येक मॅनेजिंग एजन्सी फर्म्स असमर्थ ठरल्या आहेत. इंडियन कंपनीज (अमेंडमेंट) ऑर्डिनन्स व कायदा ह्यांतील कित्येक दोष सुधारण्यासाठीं करण्यांत आला आहे.

---

**यंत्रचलित नांगरांचा अधिक उपयोग**—भारतांत शेतीसाठी वापरावयाची यांत्रिक अवजारें आणि यंत्रचलित नांगर ह्यांचा अधिकाधिक उपयोग करण्यांत येऊं लागला आहे. १९३८ सालीं फक्त ७२ ट्रॅक्टर्स वापरले जात होते. १९४९ सालीं सुमारें ७,५०० यंत्रचलित नांगर वापरले जात होते. १९४८ सालीं भारतानें ३,०३,६४७ पौंड देऊन ८४४ ट्रॅक्टर्स आणले. १९५० सालीं ३,१२९ ट्रॅक्टर्स आणले. त्यांची किंमत सुमारें १२,०६,९४८ पौंड झाली. बहुतेक सर्व यंत्रें ब्रिटनकडूनच आयात केली गेली.

**क्षयरोग्यांची सोय करावयाची झाली तर**—भारतांत सुमारें २५ लाख लोक क्षयरोगानें पछाडलेले असावेत असा अंदाज आहे. त्यांपैकीं ५ टक्के तरी दगावतात. क्षयरोग्यांना उपचार करण्यासाठी रुग्णालयें काढावयाचीं झाल्यास तीं ४,००० तरी काढावीं लागतील. त्यासाठी भांडवली खर्च ४४० कोटी रुपये येईल आणि शिवाय दरवर्षी ६० कोटी रुपये खर्च करावे लागतील, ही माहिती डॉ. जिवराज मेहता ह्यांनीं एका प्रसंगीं दिली.

**डी. डी. टी. वरील आयात जकात रद्द**—भारतामधील निरनिराळया राज्यांत हिंवतापाच्या साथीविरुद्ध डी. डी. टी.चा उपयोग करण्यांत येत असतो. परंतु ह्या कृमिनाशक रसायनाची किंमत फार वाढूं लागल्यामुळें चिंता उत्पन्न झाली होती. मुंबई व म्हैसूर राज्यांनीं भारतीय सरकारचें ह्या बाबीकडे लक्ष वेधलें होतें. त्याचा उपयोग होऊन भारतीय सरकारनें डी. डी. टी. वरील आयात जकात रद्द केली आहे.

### मॅनेजिंग एजन्सी करार मोडल्याबद्दल ५० लाख रु. नुकसानभरपाईची मागणी

१९३३ सालीं चुनीलाल व्ही. मेहता आणि कं. ह्या फर्मला सेंट्रल स्पिनिंग ॲंड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. चे २१ वर्षांचे करारानें मॅनेजिंग एजंट्स नेमण्यांत आलें. करारांत नमूद केलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याहि कारणासाठीं फर्मची मॅनेजिंग एजन्सी रद्द करण्यांत आली तर तिला २१ वर्षांपैकीं राहिलेल्या काळासाठीं दरमहा किमान ६,००० रु. प्रमाणें होणारी रक्कम नुकसानभरपाई म्हणून मिळावी, असा करार होता. १९४५ सालीं फर्मचें रूपांतर सर चुनीलाल व्ही मेहता ॲंड सन्स लि. ह्या खासगी लिमिटेड कंपनींत करण्यांत आलें. सेंट्रल स्पि. ॲंड मॅ. कं. च्या बोर्डाच्या १० एप्रिल, १९५१ च्या सभेनें एक ठराव करून फर्मची मॅनेजिंग एजन्सी २३ एप्रिलपासून रद्द करण्याचें ठरविलें. फर्मचें म्हणणें, करार रद्द केला ती गोष्ट बेकायदा झाली. मॅनेजिंग एजन्सी कराराप्रमाणें तो करार ३० जून, १९५४ पूर्वी रद्द करता येण्याजोगा होता आणि फर्मला दरमहा ६,००० रु. प्रमाणें होणाऱ्या २,२९,४०० रु. पेक्षा ज्यास्त नुकसानभरपाई मिळण्याचा अधिकार नाहीं असें कंपनीचें म्हणणें आहे. सर चुनीलाल व्ही. मेहता ॲंड सन्स लि. नें ५० लक्ष रुपये नुकसानभरपाई मागितली असून मुंबई हायकोर्टांत त्याचा दावा चालू आहे.

---

### मॉरिस–ऑस्टिन एकत्रीकरण

मॉरिस व ऑस्टिन मोटार कंपन्यांच्या नियोजित एकत्रीकरणाची माहिती गेल्या अंकांत देण्यांत आलीच आहे. ह्या दोन कंपन्या मिळून करीत असलेलें मोटारींचें उत्पादन ग्रेट ब्रिटनमधील एकूण उत्पादनाच्या निम्म्याइतकें आहे. दोन्ही कंपन्या प्रत्येकीं १,५०,००० मोटारी दरसाल तयार करतात. त्या दोन्हींत मिळून ४२,००० कामगार कामावर आहेत, आणि त्यांची मालमत्ता ६३ कोटी पौंडांचेवर आहे.

मॉरिस कंपनीचे अध्यक्ष, लॉर्ड नफील्ड ह्यांचें मूळ नांव विल्यम मॉरिस. सायकल दुरुस्त करणाऱ्याच्या हाताखालीं त्यानें कामास प्रारंभ केला. नंतर ४ पौंड भांडवलावर त्यानें स्वतःचा धंदा सुरू केला. सायकलींचें उत्पादन, नंतर मोटार सायकलींचें उत्पादन आणि १९१२ सालीं मोटारींचें उत्पादन त्यानें सुरू केलें. त्यांचें वय आतां ७४ वर्षे आहे.

---

### इंग्लंडमधील सायकलींचें उत्पादन व त्यांचे गिऱ्हाईक

ऑक्टोबर, १९५१ मध्यें इंग्लंडनें भारताकडे ३०,३६३ सायकलींची निर्गत केली. १९५१ च्या पहिल्या दहा महिन्यांत इंग्लंडनें एकूण २२,९९,५१७ सायकली निर्गत केल्या. ही संख्या १९५० मधील तत्सम संख्येपेक्षां ५ लाखांनीं मोठी आहे. निर्गतीपैकीं सर्वांत अधिक म्हणजे २,८८,००२ सायकली एकट्या मलायानें घेतल्या. भारतानें २,२७,७३३ सायकली घेतल्या. १९४९ मधील तत्सम संख्येपेक्षा ही संख्या तिप्पट आहे. इंग्लंडमध्यें आतां दरसाल ३५,००,००० सायकली तयार होतात.

---

**कागदाच्या कच्च्या मालासाठी शोध**—हिमालयांत ९,००० फुटांच्या उंचीवर उगवणारीं कांहीं झाडें वृत्तपत्रांचा कागद करण्यासाठीं कच्चा माल म्हणून वापरता येण्यासारखीं आहेत असें समजतें. मुख्य अडचण वहातुकीची आहे. ह्या बाबतींत संशोधन करण्यासाठी कांहीं परदेशीय तज्ज्ञ लवकरच भारतांत येणार आहेत.

## सरकारी रोख्यांच्या किंमतींतील घट

[illegible]

### बँकांच्या ताळेबंदावरील परिणाम

रिझर्व्ह बँकेनें बँक रेट ३% चा ३½% केला व तिनें सरकारी रोख्यांच्या बाजारास उचलून धरण्याचें धोरण बदललें, त्याचा परिणाम रोख्यांचा बाजारभाव घटण्यांत झाला आहे. भारत सरकारचे सुमारें १४०० कोटी रुपयांचे रोखे आहेत. त्या सर्वांची मिळून बाजारी किंमत सुमारें ६० कोटी रुपयांनीं उतरली आहे. सरकारी रोख्यांच्या मालकीची छाननी केली, तर स्वत: रिझर्व्ह बँकेच्या मालकीचेच एकूण रोख्यांच्या २३% रोखे आहेत, आणि त्यांची किंमत घटल्यामुळें जें नुकसान होईल, तें रिझर्व्ह बँकेच्या चालू वर्षाच्या नफ्यापेक्षाहि अधिक भरण्याचा संभव आहे. रिझर्व्ह बँकेच्या खालोखाल सुमारें २०% रोख्यांची मालकी शेड्यूल्ड व बिगर शेड्यूल्ड बँकांची आहे. शेड्यूल्ड बँकांचें नुकसान ६ ते ७ कोटी रुपये भरेल. १९५० मध्यें त्यांचा एकूण नफा १० कोटी रुपयांच्या आसपास होता. हें नुकसान चालू नफ्यांतून एकदम भरून काढण सोईचें होणार नाहीं, हें उघड आहे. सर्वच बँकांजवळ मोठाले रिझर्व्ह साठलेले नाहींत. बँकांना आपल्या गुंतवणुकीची बाजारभावानें होणारी किंमत ताळेबंदांत दाखवावी लागेल व त्यामुळें त्यांचेवरील विश्वास कमी होण्याचा संभव आहे; म्हणून ह्यासंबंधांतील कायद्याच्या कलमाची अंमलबजावणी तहकूब ठेवण्यांत यावी, अशी एक सूचना इंडियन मर्चंट्स् चेंबरनें केली आहे. परंतु ज्या कांहीं बँकांना ह्या तहकुबीचा फायदा घ्यावयाचा असेल, त्याच नेमक्या इतर बँकांपेक्षा वेगळ्या दिसून येतील व हें इष्ट होईल, असें सांगतां येणार नाहीं. बँकांपेक्षा विमा कंपन्यांवरच तात्काल परिणाम तरी चांगला होणार नाहीं. बँकांनीं आपले पैसे मुख्यत: अल्पकालीन रोख्यांतच गुंतवावे अशी सूचना रिझर्व्ह बँकेनें १९४८ सालींच केली होती. १५ वर्षांनंतर ज्या रोख्यांची दर्शनी किंमत सरकारकडून मिळावयाची आहे, अशा बँकांजवळील रोख्यांची रक्कम एकूण रोख्यांच्या रकमेच्या १७% इतकीच आहे. त्यामुळें बँकांवर रोख्यांच्या किंमतीच्या घटीचा जेवढा दुष्परिणाम होईल, त्यामानानें विमा-कंपन्यांवर जास्त प्रमाणांत होईल. त्यांना सरकारी रोख्यांत मोठ्या रकमा गुंतवाव्या लागतात व त्यांवर व्याज चांगलें सुटावें म्हणून लांब मुदतीच्या रोख्यांची निवड केली जाते. ह्यापुढें जी गुंतवणूक होईल, ती जास्त व्याजानें होईल हें खरें असलें तरी त्याचा फायदा मिळूं लागण्यास कांहीं वर्षांचा अवधि लागेल हें उघड आहे.

कांहीं विमा कंपन्यांची सरकारी रोख्यांतील गुंतवणूक

| | कोटी रु. | | कोटी रु. |
|---|---|---|---|
| एशियन | १·७१ | लक्ष्मी | १·९७ |
| भारत इं. | २·४६ | नॅशनल इं. | ३·४९ |
| बॉंबे लाइफ | २·९० | न्यू इंडिया | ७·३० |
| बॉंबे म्युच्युअल | ३·६२ | ओरिएंटल | ४७·७८ |
| एंपायर | ४·१२ | युनायटेड इं. | २·२४ |
| जनरल ॲशुअरन्स | १·१३ | वेस्टर्न इंडिया | २·०२ |
| हिंदुस्थान को. | ७·०८ | इतर | २३·४५ |
| इंड. अँड म्यूढे. | १·१० | | |
| | | | ११३·४६ |

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बळगाव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

## ताळेबंदांतील सरकारी रोख्यांच्या किंमती

### रिझर्व्ह बँकेनें दिलेली सवलत

सरकारी रोख्यांच्या किंमती उतरल्यामुळें बँकांच्या ताळेबंदांवर अनिष्ट परिणाम होणार आहे. तो टाळण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें एक सवलत देण्याचें ठरविलें आहे. वर्षअखेरीच्या हिशेबांत सरकारी रोख्यांची किंमत दाखवावयाची ती जुलै–डिसेंबर १९५१ ह्या सहामाहींतील सरासरी किंमत धरण्यास हरकत नाहीं, अशी ती सवलत आहे. १९५१ च्या तिसऱ्या तिमाहींत सरकारी रोख्यांच्या किंमती बऱ्या होत्या. १४ नोव्हेंबर रोजीं बँक रेट वाढविल्या-पासूनच त्या विशेष खालीं गेल्या आहेत. त्यामुळें, सरासरी किंमत हिशेबांत दाखविण्याची सवलत बँकांना स्वागतार्हच वाटेल. गेल्या सहामाहींतील सरासरी किंमत चालू किंमतीपेक्षा जास्त येईल हें उघड आहे. त्यामुळें, दाखवावी लागणारी घसाऱ्याची रक्कम त्यामानानें कमी होईल. गेल्या १२ महिन्यांच्या किंमतीची सरासरी घेतां यावी अशी बँकांची मागणी होती.

### बृहन्महाराष्ट्राचें डिव्हिडंड

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या डायरेक्टरांनीं ३० सप्टेंबर, १९५१ अखेरच्या वर्षासाठीं १०% डिव्हिडंड सुचविलें आहे. प्रेफरन्स भागांवर ५% डिव्हिडंड मिळेल.

### बर्मा शेल मुंबई येथें तेलशुद्धीचा कारखाना काढणार

मुंबई येथें बर्मा शेल कं. लि.नें ऑईल रिफायनरीचा कारखाना काढण्याबाबत त्या कंपनीशीं भारत सरकारनें १५ डिसेंबर रोजीं करार केला आहे.

### गॅब्रिअल पास्कलची भारतास भेट

महात्मा गांधींच्या जीवनाचा बोलपट तयार करण्याची पूर्व-तयारी पुरी करण्यासाठीं बोलपटाचे निर्माते मि. गॅब्रिअल पास्कल हे येत्या फेब्रुवारींत भारतामध्यें येणार आहेत. पं. नेहरू व इतर पुढारी ह्यांच्या ते भेटी घेतील, बोलपटाचें वेळापत्रक निश्चित करतील व मूळ कथेंतील तपशील पक्का करतील.

### युनायटेड नेशन्ससाठीं खंडणी

युनायटेड नेशन्सचें १९५२ सालाचें अंदाजपत्रक १,९५,२०,३८५ पौंडांचें आहे. त्यांपैकीं ३६% रक्कम अमेरिकेनें द्यावयाची आहे. त्याचे खालोखाल १०·५६% रक्कम ग्रेट ब्रिटन देईल. रशियाचा वाटा ९·८५% आहे. फ्रान्स ५·७५%, कॉमिन्टॉंग चीन ५·७५%, कॅनडा ३·५३%, भारत ३·५३%, पाकिस्तान ०·९५%, असे इतर वाटेकरी आहेत. अंदाजपत्रकाच्या कमिटीच्या ह्या सूचना जनरल असेंब्लीकडे मंजुरीसाठीं जातील.

### संमोहन विद्येसंबंधी कायदा होणार ?

राज्यसंस्थेच्या कायदे करण्याच्या अधिकारक्षेत्रांत गेल्या कांहीं वर्षांत बरीच वाढ झाली आहे. परंतु हिप्नॉटिझम अथवा संमोहन विद्या कायदेमंडळाच्या अधिकारकक्षेंत आलेली माहीत नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें ह्याहि विषयावर लवकरच चर्चा होईल असें दिसतें. गेल्या कांहीं दिवसांत ब्रिटनमध्यें संमोहन-विद्येचे बरेच सार्वजनिक प्रयोग झाले. संमोहन विद्येच्या प्रयोगा-प्रसंगीं जे श्रोते स्वतःवर प्रयोग करून घेण्यास तयार झाले, त्यांच्यावर प्रयोगानंतराहि कांहीं परिणाम अवशिष्ट झाल्याचें आढळून आलें आहे. एका मुलीला कांहीं एक विशिष्ट गाणें म्हणून मूर्च्छा आणण्यांत आली. चमत्कार असा कीं, ह्या मुलीनें तें गाणें ऐकतांत तिला आतां पुन्हां पुन्हां मूर्च्छा येऊं लागली आहे. अशीं कांहीं उदाहरणें ब्रिटिश पार्लमेंटपुढें चर्चेसाठीं ठेवण्यांत येणार आहेत. डॉ. स्ट्रॉस नांवाचे एक सभासदच ह्या कामीं पुढाकार घेत आहेत. त्यांनीं स्वतः संमोहन विद्येचे प्रयोग केलेले आहेत आणि त्या विद्येच्या मर्यादा आणि तदंतर्भूत धोका ह्या दोन्ही गोष्टी ते चांगल्या जाणतात. ते म्हणतात कीं, शस्त्र-क्रिया करण्यास मदत व्हावी म्हणून कांहीं प्रमाणांत ह्या विद्येचा उपयोग करण्यास हरकत नाहीं, परंतु केवळ प्रयोगासाठी ती वापरणें धोक्याचें आहे. त्यामुळें कांहींच उपयोग न होतां नुकसान मात्र होतें. संमोहन विद्या शिकणें कुणालाहि जमेल. तथापि ह्या विद्येचा प्रयोग करतांना नेमकें काय होतें तें मात्र सांगतां येत नाहीं. इतकें मात्र खरें कीं, ह्या विद्येशीं उगाचि खेळ मात्र खेळूं नये. बराच वैद्यकीय अनुभव आला आणि योग्य माणसाची निवड करतां येऊं लागली म्हणजे संमोहन विद्या वापरावी. ज्याच्यावर ह्या विद्येचा प्रयोग करण्यांत येतो त्याला आणि जो प्रयोग करतो त्या दोघांनाहि आपणास काय होत आहे अगर आपण काय करीत आहों ह्यासंबंधीं ज्ञान असत नाहीं. ब्रिटिश पार्लमेंटमध्यें ह्या विषयावर चर्चा होऊन संमोहन विद्येच्या सार्वजनिक प्रयोगास बंदी करण्यांत येईल, अशी डॉ. स्ट्रॉस ह्यांना आशा वाटत आहे.

---

### सहकारी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यांत, चांदवड येथें, सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचें उद्घाटन चांदवड तालुका को. सुपरवायझिंग युनिअनच्या ऑफिसांत श्री. दगाजी अजबा पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर, सटाणा, यांचे अध्यक्षतेखालीं ता. ३–१२–१९५१ रोजीं करण्यांत आलें.

प्रथमारंभीं श्री. कुलकर्णी यांनीं क्लासासंबंधीं प्रास्ताविक भाषण करून क्लास चांदवड येथें सुरू करण्याचीं कारणें सांगितलीं. यानंतर श्री. नरहर पाटील, श्री. बापू पाटील, सुपरवायझर व को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर यांचीं समयोचित भाषणें होऊन अध्यक्षांनीं सहकारी चळवळीचा पूर्व इतिहास सांगून हल्लींच्या वाढत्या प्रमाणांत होत असलेल्या सहकारी संस्थांचे सेक्रेटरींना सहकारी पद्धतीचे, कायदे व कार्यें यांचे शिक्षणाची आवश्यकता असल्यानें या क्लासमधूनच तें दिलें जातें त्या दृष्टीनें क्लासचें महत्त्व समजावून दिलें. त्यानंतर श्री. कुलकर्णी यांनीं बोर्डातर्फें आभारप्रदर्शन केल्यावर हा समारंभ पार पाडला.

---

हत्तींच्या शर्यतीची करमणूक—प्रिन्सेस एलिझाबेथ आणि प्रिन्स फिलिप पुढील वर्षी ऑस्ट्रेलिआ आणि न्यूझीलंडच्या दौऱ्यावर जाणार आहेत. वाटेंत ता. १ फेब्रुआरीला ते दोघे सीलोनलाहि भेट देणार आहेत. त्यावेळीं कोलंबो येथें त्यांच्या मनोरंजनासाठी २० हत्तींची एक शर्यत ठेवण्यांत येणार आहे.


पहिल्याच मूल्यमापनांत नफा वाटणारी

**दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

★ प्रमाणशीर खर्चांत मिळेल असें फक्त निवडक काम घेणें हें कंपनीचें ध्येय आहे, व यांतच विमेदारांचें अंतिम हित आहे. ★

सर्वत्र प्रतिनिधी पाहिजेत.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस ॲंड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, लाख तेलें, लांकूड आणि कोळसा वगैरे.



## गिऱ्हाइकांशीं भाषण कसें करावें ?

न्यूयॉर्क विश्वविद्यालयाचे श्री. बोर्डन व श्री. बुझ यांनीं विक्री व विक्रेता या विषयांचा संपूर्ण अभ्यास केला आहे. १५,००० विक्रेत्यांच्या मुलाखती प्रत्यक्ष दुकानांत विक्री चालू असतांना घेतल्या. तेव्हांचें सर्व संभाषण लघुलिपीकारांकडून लिहून घेतलें व त्या सर्वांतून सहा मुख्य मुद्दे काढले. हे मुद्दे त्यांनीं विक्री-केंद्रांकडे पाठविले व त्याप्रमाणें सुधारणा केल्यानें प्रत्यक्ष विक्री वाढत आहे असा अनुभव आला आहे. ते मुद्दे खालीलप्रमाणें आहेत.

**१ गिऱ्हाइकाला बोलूं द्या !:**—विक्रेत्यानें स्वतः फार बोलूं नये. गिऱ्हाइकाला बोलावेसे व प्रश्न विचारावेसे वाटतात. गिऱ्हाइकांचें म्हणणें काय इकडे जास्त लक्ष द्या—त्यांच्या तक्रारीं-कडे लक्ष पुरावा. जर स्वतः बोलून गिऱ्हाइकाला तुम्ही बोलायला वेळच दिला नाहींत तर त्याच्या मनांतले प्रश्न अनुच्चारित राहून जातील. त्यामुळें तो नाखूष जास्त जास्त होत जाईल. त्याच्या मनांतले प्रश्न मनांतच दडपले गेले तर ते वाढीला लागतात. तेंच तुम्ही त्याला मोकळेपणें विचारूं दिलें तर त्याचें महत्त्व त्याच्या स्वतःच्याच मनांत कमी होत जाईल व शंकांचें निरसन झाल्यानें तो खूष होईल.

**२ मधेंच आडवूं नका:**—गिऱ्हाईक कांहीं बोलत असतां मधेंच त्याला थांबवून उत्तर देण्याचा प्रयत्न करूं नका. त्यामुळें गिऱ्हाईक विरोधी बनतो व चिडतो. तुम्ही कितीहि गोडीत त्याच्यामधें बोललांत तरी त्याचें म्हणणें पूर्ण न ऐकल्यानें तो रागावतो. गिऱ्हाइकाचा मुद्दा ऐकत असतां त्यावर एकादें उत्तम उत्तर देऊन त्याला निरुत्तर करण्याचा मोह आवरणें कठीण आहे. पण तो आवरला पाहिजे. गिऱ्हाइक अर्धवट मुद्दा मांडत असतां तो काय म्हणणार आहे हें आधींच गृहीत धरून जर तुम्ही त्याविरुद्ध बोललात तर कदाचित् तुम्ही जें समजलांत तें त्याला म्हणायचें नसेलहि आणि म्हणून तुमचें उत्तर चुकीचें ठरेल. जरी तुम्ही त्याला काय म्हणावयाचें आहे तें बरोबर ओळखलेंत तरी तें त्याला पूर्ण मांडू न दिल्यानें तो चिरडीला जाईल व तुमची बाजू ऐकण्याची इच्छा त्याला रहाणार नाहीं. गिऱ्हाईकाला त्याचें संपूर्ण म्हणणें मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे हें लक्षांत घ्या. तें पूर्णपणें ऐकून व नंतर तुमचें त्याला उत्तर सांगा.

**३ दुराग्रही बनूं नका:**—दुराग्रहानें तुमचें म्हणणें गिऱ्हाइका-पुढें मांडूं नका. गिऱ्हाइकाशीं भाषण हें केवळ मित्रत्वाच्या भावनेनें झालें पाहिजे. त्यामध्यें वैयक्तिक वादंग असूं नये. तुमचा आवाज कधींही चढता कामा नये, किंवा त्यांत तुच्छता अगर उपहास यांची छटा सुद्धां यऊं नये. बोलतांना तुमच्या चेहऱ्यावरील भावहि महत्त्वाचा आहे. तुच्छता किंवा गर्भित उपहास हा त्याहूनहि फार वाईट. वाद जिंकला व विक्री हातची गेली, अशी परिस्थिति काय कामाची ?

**४ गिऱ्हाइकाचें म्हणणें पूर्ण ऐकून घ्या :**—गिऱ्हाइकाशीं प्रथम बोलतांना त्याचें म्हणणें व विरोध संपूर्णपणें ऐकून घ्या. इतकेंच नाहीं तर विरोधाचा मुख्य मुद्दा काय आहे तो बरोबर लक्षांत घ्या व इतर विरोधाचे कमी महत्वाचे मुद्देही लक्षांत घ्या. सर्व ऐकून घेतल्यावर कशावर भर देऊन बोलायचें हें तुम्हाला कळेल. नाहींतर गिऱ्हाइकाच्या मनांत ज्याला विशेष महत्त्व नाहीं अशा मुद्यावरच वाद घेण्यांत तुमचा सर्व वेळ नाहींसा होईल आणि त्याच्या मनांत त्या मुद्याला फारसें महत्त्व नसेल !

**५ गिऱ्हाइकाचा मुद्दा स्वतःच्या शब्दांत मांडा :**—गिऱ्हाइकानें विरोध केल्यास त्याचा विरोधी मुद्दा त्याला तुम्ही स्वतः मांडून दाखवा. हें अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यामुळें तुमचा पुष्कळ वेळ वाचेल. नाहींतर तुम्हाला आपलें म्हणणें कळलें नाहीं अशा कल्पनेंत गिऱ्हाइक तुम्हाला स्वतःची बाजू पुन्हां पुन्हां सांगेल. गिऱ्हाइकाचा मुद्दा त्याच्यापेक्षां जास्त स्पष्टपणें व जोरानें तुम्ही त्याला मांडून दाखवा. म्हणजे आपलें म्हणणें तुम्हाला समजलें आहे अशी त्याची खात्री होईल व तुम्ही याचें बरोबर उत्तर द्याल अशी त्याला खात्री वाटेल. तुमच्याबद्दलचा त्याचा विश्वास यामुळें वाढेल. कारण मूळ मुद्याला तुम्ही बगल देतां आहांत अशी समजूत त्याची होणार नाहीं. किंवा त्याचें म्हणणें तुम्ही ऐकून घेत नाहीं असेंहि त्याला वाटणार नाहीं.

**६ लक्ष केंद्रित करा :** एकदां गिऱ्हाइकाचें सर्व ऐकून घेतल्यावर व त्याचा मुख्य विरोध काय तो लक्षांत घेतल्यावर त्यावरच सर्व लक्ष व उत्तर केंद्रित करा. तें बाजूला टाकून इतर गोष्टींकडे वळायला ग्राहकाला वेळ देऊं नका. मुख्य विरोधाचा मुद्दाच संपला म्हणजे इतर लहान सहान मुद्दे आपोआप विरघळून जातील व गिऱ्हाईक खुशीनें तुमचा माल घेईल.

( "सहयोग" )

## सहकारी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासची
# नोटीस

दक्षिण सातारा जिल्हा को. ऑ. बोर्डाच्या विद्यमानें इस्लामपूर येथें को. ऑ. सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास भरविणेचें ठरविलें आहे. सदर क्लास ता. १५ जानेवारी १९५२ पासून दोन महिने चालेल. द. सातारा जिल्ह्यांतील सहकारी संस्थांनीं आपले अनट्रेंड सेक्रेटरींना सदर क्लासला पाठवून क्लासचा फायदा घ्यावा. दक्षिण सातारा जिल्ह्यांतील नवीन अनट्रेंड सेक्रेटरींनींही व इतर व्ह. फा. पास झालेल्या उमेदवारांनीं अर्ज ता. १० जानेवारी १९५२ चे आंत पाठवावेत. सोबत क्लास व परीक्षेची फी मिळून एकंदर रु. ३ ची मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर मे. ऑ. सेक्रेटरीसाहेब यांचेकडे, दक्षिण सातारा जिल्हा को. ऑ. बोर्ड लि. कार्लेकर वाडा, ५९२ सांगली, या पत्त्यावर करावी, उमेदवारांनीं अर्जांत नांव, शिक्षण, वय, पूर्ण पत्ता नमूद करावा. संस्थेंत काम करीत असलेस त्या संस्थेचें नांव लिहावें.

ज्यांनीं मुदतींत अर्ज व फी पाठविली असेल त्यांनीं १५ जानेवारी १९५२ रोजीं दुपारीं १ वाजतां वारणा व्हॅली सहकारी खरेदी-विक्री संघ लि. इस्लामपूर येथें हजर रहावें.

येतांना अंथरूण, पांघरूण, टांचण वह्या बरोबर आणाव्यात. जेवणाची सोय ज्याची त्यानें करावयाची आहे. राहणेची सोय केली जाईल. क्लासचा कार्यक्रम व परीक्षेची तारीख क्लासांत जाहीर केली जाईल.

ता. ५।१२।१९५१.

| | |
|---|---|
| डी. बी. निकम B. A. | व्ही. ए. शिंदे |
| ऑ. सेक्रेटरी. | चेअरमन. |
| दक्षिण सातारा जि. को. ऑ. | दक्षिण सातारा जि. को ऑ. |
| बोर्ड लि. सांगली. | बोर्ड लि. सांगली. |


**पांढऱ्या कोडावर**

सन १९३६ पासून आजपर्यंत बक्षीसें व हजारों प्रशस्तीपत्रें मिळालेलें अनुभविक औषध. किं. ५ रु. पो. ख. १५ आ. अनेक लोकांचे "अनुभव", एक आण्याचें तिकिट पाठवून मागवा. वैद्य के. आर. बोरकर, पो. मंगरूळपीर, जि. आकोला ( वऱ्हाड ).

## विमा-कंपन्यांतील चालक-नौकर भांडणें

बँका आणि त्यांचे नौकर ह्यांच्यांतील भांडणें सोडविण्यासाठीं भारतीय सरकारनें अॅडज्युडिकेशनची पद्धत स्वीकारलेलीच आहे. आतां विमा-कंपन्यांचे नौकर व चालक ह्यांच्यांतील भांडणें सोडविण्यासाठींहि ह्याच पद्धतीचा अवलंब करण्यांत आला आहे. भारतीय सरकारनें अशा भांडणांबाबत एका इंडस्ट्रिअल कोर्टाची नेमणूक केली आहे. कलकत्त्यामधील १२ विमा कंपन्या आणि त्यांचा नौकर वर्ग ह्यांच्यामधील तंटे सोडविण्याचें काम ह्या औद्योगिक कोर्टाकडे सोपविण्यांत आलें आहे. कोर्टापुढें जीं भांडणें येणार आहेत त्यांत विमा कंपन्यांच्या नौकरांच्या पगाराची श्रेणी, महागाईभत्ता, घरभाडें, बोनस, प्रॉव्हिडंट फंड, कामाचे तास, रजा, सेवानिवृत्तीचे वय, जादा कामाबद्दल वेतन, वैद्यकीय मदत, आणि मधल्या वेळचा मोफत उपाहार इत्यादि अनेक विषय अंतर्भूत आहेत. भारतीय सरकारच्या मजूर खात्यानें एक वटहुकूम काढून भारतामधील कोणत्याहि भागांत औद्योगिक कोर्टाचा निकाल अंमलांत आणावयास लावावयाची सत्ता आपणाकडे घेतलेली आहे. एखाद्या राज्यांतील विमा कंपनी आणि तिचे नौकर ह्यांच्यांत भांडण नसलें तरीसुद्धां कोर्टाचा निवाडा अंमलांत आणण्याचें बंधन मजूर खातें घालूं शकेल. निवाडा लागू होण्याच्या क्षेत्रांत फक्त जम्मू काश्मीर ह्याचा समावेश नाहीं. मुंबईमधील कांहीं विमा कंपन्या व त्यांचे नौकर ह्यांच्यामध्यें तंटे चालू आहेत. त्यांच्या बाबतींतहि निवाडा लागू होणार असें दिसतें. रिझर्व्ह बँकेनें आपला व्याजाचा दर ३ टक्क्यावरून ३॥ टक्के केल्यामुळें सरकारी रोख्यांच्या किंमती घसरल्या आहेत विमा कंपन्यांना बरीच मोठी रक्कम सरकारी रोख्यांत गुंतवावी लागते. त्यामुळें त्यांची परिस्थिति बिकट झालेली आहे. त्यांतच औद्योगिक कोर्टाच्या निवाड्याची आणखी भर पडली आहे.

---

## कापसाच्या पिकाचा अंदाज

भारतांत १९५१-५२ या चालू वर्षांत १,२३,२१,००० एकर जमिनींत कापसाची लागवड झाली असावी. गेल्या वर्षीच्या सुधारलेल्या दुसऱ्या अंदाजाचा हाच आंकडा १,०१,९२,००० होता. म्हणजे या वर्षीच्या लागवडींत २०.९ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून येईल. कापसाच्या जातींनुसार चाल व मागील वर्षाच्या लागवडीचें क्षेत्र पुढीलप्रमाणें आहे:—

| कापसाचा प्रकार | लागवड (हजार एकर) | |
| --- | --- | --- |
| | १९५१-५२ | १९५०-५१ |
| बंगाल | ९८७ | ७७१ |
| अमेरिकन | ८७८ | ६८३ |
| उमरा | ३,९२९ | ३,३०२ |
| भडोच | ७७५ | ६९१ |
| सुरती | २८६ | २४२ |
| धोलेरा | १,२८६ | १,११९ |
| इतर | ४,१८० | ३,३८४ |
| | १२,३२१ | १०,१९२ |

चालू वर्षाच्या लागवडींत प्रामुख्यानें मुंबई, मध्य प्रदेश, हैद्राबाद, मध्यभारत या राज्यांत वाढ झाली. मद्रास, उत्तर प्रदेश, पंजाब, पेप्सु व राजस्थान या राज्यांतहि लागवडींत थोडी वाढ झाल्याची नोंद आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

दि

युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

अधिकृत भांडवल ... ८ कोटी रु.
खपलेलें भांडवल ... ४ कोटी रु.
वसूल भांडवल ... २ कोटी रु.
रिझर्व्ह फंड ... ६० लक्ष रु.

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

ईश्वरीप्रसाद गोएंका, व्हाइस चेअरमन — रमणलाल जी. सरय्या, व्हाइस चेअरमन
अनंत चरण लॉ — महादेव एल. डहाणूकर
बैजनाथ जालन — मदनमोहन आर. रुइया
गोविंदलाल बंगूर — मोहनलाल एल. शहा
पी. डी. हिमतसिंगका — मोतीलाल तापुरिया
रामेश्वरलाल नोपानी — नवीनचंद्र मफतलाल

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या संबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.